# ❖ पूर्ण करण्यात आलेले प्रकल्प-

**१. संस्थानचे शांतीनिवास इमारतीचे दुस-या व तिस-या मजल्यावरील प्रशासकीय कार्यालय पॅसेज व जिन्यामध्ये असलेले कोटा फ्लोरींग काढून त्या ठिकाणी ग्रेनाईट फ्लोरींग करणे-**

संस्थानचे शांतीनिवास इमारतीचे दुस-या व तिस-या मजल्यावरील प्रशासकीय कार्यालय पॅसेज व जिन्यामध्ये असलेले कोटा फ्लोरींग काढून त्या ठिकाणी ग्रेनाईट फ्लोरींग बसविलेले आहे. याकामी रक्कम रु.११,७८,९५८/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

**२. श्री साईबाबा हॉस्पिटलचे वैद्यकिय संचालक यांचे दालनाचे विस्तारीकरण व नुतनीकरण करणे-**

वैद्यकिय संचालक यांना भेटनेसाठी येणारे रुग्णालयातील रुग्ण, रूग्णांचे नातेवाईक, कर्मचारी व दिवसभरात डॉक्टरांनी केलेल्या कामांचा त्यांचेकडून आढावा घेणे तसेच मिटींग घेणेसाठी पुरेशी जागा पुर्वीचे कॅबीनमध्ये उपलब्ध नसल्याने सदरहू दालनाचे विस्तारीकरण व नुतनीकरण गरजेचे आहे. त्यानुसार सध्याचे कॅबीनचे दक्षिणेस असलेल्या तीन कॅबीन व पॅसेजचे एकत्रीकरण करुन त्याचे नुतनीकरण व इंटेरिअरचे काम करुन सुसज्ज दालन तयार करणे प्रस्तावित आहे. सदरकामी रक्कम रु.४,५४,०००/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

**३. समाधी मंदिर परिसरातील पारायण हॉल (प्रतिक्षालय) व साई सभागृह हॉल (मिटींग हॉल) लगतचे पूर्व बाजूकडील ओपन टू स्काय भागावर आर.सी.सी स्लोपींग स्लॅब टाकणे-**

कोविड-१९ या साथ रोग आजाराचे कालावधीत साईसत्यव्रत पूजा, अभिषेक पूजा तसेच पारायण हॉलही बंद ठेवणेत आले आहे. दरम्यान सध्या साईभक्तांकरीता बंद असलेला पारायण हॉलचा वापर मिटींग हॉलमध्ये व सध्याचे साई सभागृह (मिटींग हॉलचा) वापर प्रतिक्षालय म्हणून करुन सदरहू हॉल व कॉरीडॉर मधील ओपन टु स्काय भागावर ऊन व पावसापासून संरक्षण होणेसाठी आरसीसी स्लॅबचे छत तयार करणेत आले आहे. सदर दोन्ही हॉलचे पूर्व बाजूकडील ओपन टु स्काय भागावर स्लोपींग आरसीसी स्लॅब टाकणेकामी रक्कम रु.३,१९,४१५/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

**४. संस्थानचे साई सभागृहासमोर आर.सी.सी. स्लॅब व संलग्न सिव्हील कामे करुन कॉरीडॉरचे बांधकाम करणे -**

संस्थानचे लेंडीबागेतील साई सभागृह व मान्यवरांचे प्रतिक्षा कक्ष या ठिकाणी सातत्याने महत्वाच्या /अतिमहत्वाच्या व्यक्तिंचा वावर असतो. परंतु साई सभागृहाचे समोर (पश्चिम बाजुस) छत नसल्याने ऊन व पावसामुळे येणारे मान्यवरांची तसेच त्यांचे समवेत असलेल्या व्यक्तिंची गैरसोय होते. पाऊस आल्यानंतर फ्लोरींग ओले झाल्यामुळे त्याठिकाणी एखादी व्यक्ती पाय घसरुन पडण्याची शक्यता होती. तसेच पावसामुळे मान्यवरांची पादत्राणे ओली होत होती. त्यामुळे संस्थानचे साई सभागृहासमोर आर.सी.सी. स्लॅब व संलग्न सिव्हील कामे करुन कॉरीडॉरचे बांधकाम करणेत आले आहे. सदर कामासाठी एकूण रु.४,४८,४१७/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

**५. श्री साईबाबा हॉस्पीटल येथिल पॅथोलॉजी विभागातील हिस्टोपॅथोलॉजी लॅब ही श्री साईनाथ रक्तपेढीचे दुसरा मजला येथे स्थलांतरीत करणे -**

श्री साईबाबा हॉस्पीटल येथिल हिस्टोपॅथोलॉजी लॅब ही पुर्वी तळमजल्यावर होती. त्या ठिकाणी पॅथोलॉजी लॅब असल्याने दोन्ही विभागांचे कर्मचारी यांना काम करणेस अडचणी येत होत्या. त्यामुळे सदर हिस्टोपॅथोलॉजी लॅब ही रुग्णालयाचे मागणीप्रमाणे श्री साईनाथ रक्तपेढीचे दुसरा मजला येथे स्थलांतरीत करणेत आली आहे. सदर कामासाठी रु.१,८१,८५८/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

**६. संस्थानचे साईनिवास अतिथीगृहासमोरील बायोमेट्रीक पास काऊंटर शेड सर्व्हे क्र.०४ (श्री. नितिन कोते यांचे क्षेत्रात) मध्ये तात्पूरत्या कालावधीकरीता स्थलांतरीत करणे -**

साईभक्तांचे सोईसाठी श्री. नितीन उत्तमराव कोते, शिर्डी यांचे सर्व्हे नं.४/१ पै. मधील श्रीराम पार्किंगमध्ये १२ बायोमेट्रीक पास काऊंटर्सकरीता शेड तयार करणेत आले होते. सदर शेड मंदिरापासून थोडे जादा अंतरावर होते. साईभक्तांना सोईचे दृष्टीने सदरचे बायोमेट्रीक पास काऊंटर शेड त्याच प्लॉटमध्ये हॉटेल गोरडीया लगत मंदिराचे जवळ हलविणे गरजेचे होते. तसेच साईनिवास अतिथीगृहासमोरील बायोमेट्रीक पास काऊंटर शेड खोलून सदर जागा ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना UGT व STP चे कामासाठी उपलब्ध करणे गरजेचे होते. कोविड-१९ मुळे साई मंदिर दर्शन बंद केल्याने सर्व्हे नं.४/१ पै. मधिल शेड न खोलता साईनिवास अतिथीगृहासमोरील बायोमेट्रीक पास काऊंटर खोलून ते हॉटेल गोरडीया लगत असलेल्या जागेत तयार करणेत आले व ठेकेदार श्रीम भानू कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांना साईनिवास अतिथीगृहासमोरील जागा कामासाठी जागा मोकळी करून देणेत आली आहे. सदर बायोमेट्रीक पास काऊंटरचे कामासाठी रु.२,९६,९३६/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

**७. साईपालखी निवारा येथिल बी इमारती मधील रुम्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणेकरीता बुकींग कार्यालय, काऊंटर, स्टोअर रुम व कॅन्टीन व्यवस्था करणेबाबत-**

मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार साई पालखी निवारा बी इमारतीतील ६४ वातानुकूलित रुम्स साईभक्तांच्या निवास व्यवस्थेकरीता सुरु करणेसाठी सदर इमारतीचे तळमजल्यावर मोकळया जागेत रुम बुकींग कार्यालय व काऊंटर तसेच स्टोअर रुम व कॅन्टीन व्यवस्था तयार करणे आवश्यक होते. करीता सदरहू ठिकाणी ऐरोकॉन पॅनल पार्टीशन मध्ये रुम बुकींग कार्यालय, स्टोअर रुम, पॅनल रुम व कॅन्टीन व्यवस्था तयार करणेत आली आहे. सदरहू कामी रक्कम रु.२,५३,३००/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

# ❖ प्रगतीपथावर असलेले प्रकल्प

**१. श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम करणे -**

शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या वाढत्या गर्दीचे नियोजनासाठी व भक्तांचे दर्शन सुलभ व सुखकर व्हावे, दर्शनरांगेत भक्तांना सर्व सोई-सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने मंदिर व जुने प्रसादालय परिसराचे पुनर्नियोजन करण्याचा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला होता. या पुनर्विकास प्रकल्पात साईभक्तांना सुधारीत दर्शन रांग, १२ मोठे प्रतिक्षा हॉल बैठक व्यवस्थेसह, स्वच्छतागृह, चप्पल स्टॅण्ड, प्रथमोपचार केंद्र, सुरक्षा तपासणी, मोबाईल व लगेज लॉकर्स, सेंट्रल ए.सी., शुध्द पिण्याचे पाणी, बुक स्टॉल, कापडकोठी, लाडू प्रसाद काऊंटर्स, उदी काऊंटर्स, देणगी काऊंटर्स, स्नॅक्स काऊंटर, फायर लिफ्ट, पॅसेंजर लिफ्ट, सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, विद्यूतीकरण व्यवस्था, लॅण्डस्केपींग, सी.सी.टी.व्ही, सुरक्षा केंद्र, चहा व स्नॅक्स काऊंटर्स, स्वतंत्र पेड पास काउंटर्स आदि सुविधांचा तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व बाबी समाविष्ट करुन नविन दर्शनरांग प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पाचे बांधकाम क्षेत्रफळ हे २२,२१४ चौ.मी. इतके आहे. सदर प्रकल्पाचे काम प्रगतीत असून या वर्षा अखेरीस काम पूर्ण होऊन सदर प्रकल्प साईभक्तांचे वापरात येईल. सदर प्रकल्पाचे पुर्णत्वासाठी एकूण रक्कम रु.१०९.५० कोटी मात्र इतका खर्च येणार आहे. मार्च २०२१ अखेर सदर कामासाठी रक्कम रु.६०.१८१ कोटी मात्र इतका खर्च झालेला आहे.

**२. नविन शैक्षणिक संकुलाची उभारणी करणे-**

मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं. १८३ मधील १३.५ एकर जागेत श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कूल, कन्या विद्यामंदिर, संस्थान महाविद्यालय यांचेकरीता स्वंतत्र इमारतीचे बांधकाम करणेत येत असून सदर प्रकल्पाचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ ७,१७,३२६ चौ.फुट आहे. यामध्ये सर्व शैक्षणिक संस्थांकरीता स्वतंत्र इमारत असून श्री साईबाबा इंग्लिश मेडिअम स्कुलचे इमारतीमध्ये ७२ वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, वाचनालय, कार्यालय व कॉन्फरंन्स हॉल इ. तयार करणेत आलेल्या आहेत. कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ व वरीष्ठ महाविद्यालय इमारतीत प्रत्येकी ४२ वर्ग खोल्या, प्रयोगशाळा, वाचनालय, कार्यालय इ. तयार करणेत आलेले आहेत. तसेच १०५० क्षमतेचे ऑडीटोरीयम व स्वतंत्र जिमखाना, स्विमिंग पुल तयार करणेचे काम चालू आहे. सदरहू इमारती या आर.सी.सी. असून खोल्यांचे फ्लोरींग व डॅडोकरीता व्हिट्रीफाईड फर्शि तसेच पॅसेज व जिन्याचे फ्लोरींगकरीता ग्रेनाईट बसविणेत येत आहे. इमारतीचे बाहेरील बाजूने वायर कट विटांचे क्लॅडींग करणेचे काम जवळजवळ पूर्ण झालेले आहे. परिसरात अंतर्गत रस्ते, पथदिवे, कंपाऊंड भिंत, विद्युत सबस्टेशन एसटीपी प्लॅन्ट, वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट व भूमिगत पाण्याच्या टाक्या तयार करणेत येणार आहे. सदरहु इमारतीचे बांधकाम ठेकेदार यांचेमार्फत सुरु असून याकामी एकूण रक्कम रुपये २१८ कोटी मात्र इतका खर्च येणार असून मार्च २०२१ अखेर रक्कम रु.१३५.४१ कोटी खर्च आलेला आहे.

**३. श्री साईनाथ रुग्णालय इमारतींवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणे-**

दिवसेंदिवस वाढती रुग्णांची गर्दी लक्षात घेता उपलब्ध असलेल्या सोयी सुविधा या अपु-या पडत असल्याने रुग्णांना पुरेशा प्रमाणात सुविधा देणे अडचणीचे होत आहे. याकरीता श्री साईनाथ रुग्णालय इमारतींवर अतिरिक्त तिस-या मजल्याचे बांधकाम सुरु आहे. यामध्ये १०० बेडस् ची सुविधा करणेत आलेली असून आय.सी.सी.यु. करीता १० बेड, ०४ स्पेशल रुम, ०४ डॉक्टर्स रुम, ऑपरेशन थिएटर, कॉन्फरंस हॉल, नर्सिंग स्टेशन, वेटींग एरीया, व स्टोअर इ. सुविधा तयार करणेत आलेल्या आहेत. इमारत क्र.०१ चे तिस-या मजल्याचा रुग्णांसाठी वापर सुरु करणेत आला असुन इमारत क्रं. ०२ चे काम अंतिम टप्प्यात आहे. सदरहू कामी ठेकेदार यांना मार्च २०२१ अखेरपर्यंत रक्कम रु.२.६१ कोटी मात्र अदा करणेत आलेले आहे. याकामी एकूण रक्कम रु.३.९९ कोटी मात्र इतका खर्च येणार आहे.

**४. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे खोल्यांचे नूतनीकरण करणे-**

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये एकूण ५२७ खोल्या आहे. सन १९९४ पासून सदरची इमारत पूर्ण क्षमतेने साईभक्तांचे वापरात आहे. सततचे वापराने खोल्यांचे रंगकाम व संडास बाथरुमचे लोखंडी फ्रेमचे दरवाजे व शटर्स, खिडक्या, प्लबींग फिटींग खराब झालेले होते. त्यामुळे सन १९९९-२००० मध्ये सदर इमारतीचे खोल्यामधील संडास-बाथरुम दुरुस्तीचे काम करुन घेण्यात आले आहे. त्यानंतर पहिल्या टप्प्यात सन २०१०-११ मध्ये १०३ खोल्यांचे नूतनीकरण करणेत आले आहे. उर्वरीत ३८६ खोल्यांसह इमारतीचे नूतनीकरण करणेकामी खोल्यांचे आतील बाजूने लस्टर पेंटमध्ये रंगकाम, संडास बाथरुमचे कॉक्रीट फ्रेमचे दरवाजे व वॉटरप्रुफ शटर्स, ॲल्युमिनियम खिडक्या, प्लबींग फिटींग, प्रसाधनगृहे नुतनीकरण, रिनोव्हा पेंटने बाहेरील रंगकाम करणे इत्यादी कामांसाठी ठेकेदार यांना रु.१३.०८ कोटी रकमेचा कार्यादेश देण्यात आला आहे. सदर कामातील एकूण २४१ खोल्यांची कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत खोल्यांचे नुतनीकरण प्रगतीपथावर आहे. सदर कामासाठी मार्च २०२१ अखेर रक्कम रु.८.७१ कोटी मात्र इतका खर्च आलेला आहे.

**५. साईआश्रम भक्तनिवास येथील खोल्यांचे रंगकाम व दुरुस्तीचे काम करणे-**

साईआश्रम भक्तनिवास मध्ये १५३६ खोल्या आहेत. सदरहू इमारतीचे बांधकाम सन-२०१२ मध्ये पूर्ण झालेले आहे. परंतू सततचे वापरामुळे सदर खोल्यांचे आतील रंगकाम, टॉयलेट बाथरुमचे फ्लश डोअर, रुममधील आरशे, टॉयलेटचे फ्लश व्हॉल्व खराब झालेले आहे. तसेच सहा इमारतींचे पॉलीकार्बोनेट डोमचे शिट खराब झालेले आहे. सदर कामामध्ये एकूण १२ निवासी इमारती, बुकींग ऑफीस, डी.जी. रुम व ॲम्फीथिएटर या इमारतींचा समावेश आहे. साई आश्रम येथिल १५३६ निवासी खोल्यांपैकी १४०८ खोल्यांचे रंगकाम व दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून उर्वरीत १२८ खोल्यांचे काम बाकी असून ते काम प्रगतीत आहे. A, B, C, E, F, G, H, I, J, K, L, R-Block, OAT, DG Room या इमारतींचे काम पूर्ण झाले आहे. सध्या D इमारतीचे (१२८ खोल्या) काम प्रगतीत आहे. सदरहू कामी ठेकेदार यांना मार्च २०२१ अखेरपर्यंत रक्कम रु.४.०६ कोटी मात्र अदा करणेत आलेले असून याकामी एकूण रक्कम रु.४.८३ कोटी मात्र इतका खर्च येणार आहे.

**६. संस्थानचे साई उद्यान इमारतीमधील हॉलकडील बाजुचे टॉयलेट ब्लॉक नुतनीकरण करणे-**

संस्थानचे साई उद्यान इमारतीमधील हॉलकडील बाजुचे टॉयलेट नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून टॉयलेट ब्लॉक मधील जुनी फ्लोरींग काढून त्या ठिकाणी नवीन व्हट्रीफाईट फ्लोरींग बसविणे, वॉटर प्रुफींग करणे, संडास भांडे बदलणे, नविन प्लंबींग फिक्चर्स बसविणे, पी.व्ही.सी पॅनल दरवाजे बसविणे, ड्रेनेज लाईन बदलणे, सी.पी.व्ही.सी पाईप लाईन टाकणे., आदि कामे करणेसाठी ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला असून सदरहू काम प्रगतीपथावर आहे. याकामी रक्कम रु.२७.३० लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**७. निमगाव-को-हाळे येथील वर्ग-०४ कर्मचारी निवासस्थान इमारतीचे आतिल व बाहेरील बाजुने रंगकाम करणे-**

श्री साईबाबा संस्थान मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं. १६९ मधील जागेत वर्ग ०४ कर्मचा-यांसाठी एकूण ०८ इमारतींचे बांधकाम करण्यात आलेले आहे. एका इमारतीमध्ये १२ सदनिका असून एकूण ०८ इमारतींमध्ये ९६ सदनिका आहेत. सदरहू इमारतीचे बांधकामास व रंगकामास १२ वर्षांचा कालावधी झाला असून इमारतीच्या आतील व बाहेरील भागाचा रंग खराब झालेला आहे. सदर रंगकाम नव्याने करणेसाठी अंदाजे रक्कम रु.५६.५७ लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे.

**८. मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील हद्दीवरील गेट नं. ०४ ते नगर मनमाड रस्त्यापर्यंतचे कम्पाऊंड भिंतीचे नव्याने बांधकाम करणे-**

मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील हद्दीवरील गेट नं.०४ ते नगर मनमाड रस्त्यापर्यंतचे कम्पाऊंड भिंतीचा पाया मोडकळीस आल्याने सदर भिंतीचे संपूर्ण बांधकाम काढून नव्याने बांधकाम करणेकामी रक्कम रु.१५,७३,२३५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. याकामी ई निविदा प्रक्रिया राबविणेत आली असून निम्नतम दराचे ठेकेदार कासम इलियास कच्छी, मनमाड यांना रक्कम रु.१०,२२,८९३/- मात्र रकमेचा कार्यादेश देणेत आला आहे. ठेकेदार यांनी उपलब्ध जागेतील काम परफोरेटेड शीट बसविणे व्यतिरिक्त पूर्ण केले आहे.

**९. कोविड १९ या साथ रोगातील रुग्णांचे स्वॅबचे नमूने तपासणीसाठी आर.टी.पी.सी.आर. लॅब तयार करणे-**

कोव्हीड-१९ या साथीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी रुग्णांची वाढती संख्या विचारात घेऊन कोविड टेस्टींगसाठी आर.टी.पी.सी.आर. लॅब तयार करणे आवश्यक होते. टेस्टींगसाठी येणारे रुग्णांची तपासणी होऊन पॉझिटिव्ह रुग्णांना तातडीने वैद्यकीय उपचार मिळणेकामी संस्थानमार्फत कोविड-१९ या साथ रोगातील रुग्णांचे स्वॅबचे नमूने तपासणीसाठी द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावरील उत्तरेकडील पाच रुम्समध्ये आरटी पी.सी.आर. लॅब तयार करणेत आली आहे. सदरहु रूम्समध्ये रंगकाम करणे, ॲल्युमिनियम पार्टीशन/दरवाजे करून केबिन्स करणे व स्टीलचे फ्रेमवर कडप्पे टाकून प्लॅटफॉर्म बनविणे तसेच ऊन पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी लॅबसमोरील जागेत शेड तयार करणे या कामांसाठी एकूण रक्कम रु.३,९७,८७८/- इतका खर्च आलेला आहे.

**१०. लाडू प्रसाद निर्मिती विभागातील बुंदी किचन शेडमधील फ्लोरींग करीता पॉलीश्ड कोटा फरशी बसविणेबाबत -**

श्री साईप्रसादालया मधील मोतीचूर बुंदी किचनमध्ये प्रसादाची बुंदी तळण्याचे काम करणेत येते. सदर किचनमध्ये रफ शहाबाद फ्लोरींग बसविणेत आलेली होती. सततचे वापराने व भट्टयांच्या उष्णतेमुळे सदरची रफ शहाबाद फ्लोरींग फुटलेली असल्यामुळे साफसफाई करणेस अडचण येत असल्याने फ्लोरींगकरीता पॉलीश्ड कोटा फरशी बसविणेत येत आहे. सदर कामासाठी रक्कम रु.३,२५,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**११. संस्थानचे प्रशासकीय कार्यालयाच्या शांतीनिवास इमारतीस लिफ्ट बसविणेकामी लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करणे -**

शांतिनिवास इमारतीत दुस-या व तिस-या मजल्यावर प्रशासकिय कार्यालय आहे. कर्मचारी, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांना प्रशासकीय कार्यालयात येणेसाठी एकच जिना आहे. याशिवाय दिव्यांग व वयोवृध्द हे सुध्दा या जिन्यानेच ये-जा करतात. त्यामुळे याठिकाणी लिफ्टची आवश्यकता असल्याने शांतिनिवास इमारतीचे आतील बाजूस मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालनाजवळील जिन्याचे समोरील भागात शाफ्टमध्ये लिफ्ट बसविणे व याकरीता लिफ्ट शाफ्टचे बांधकाम करणेसाठी विहित पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रु.३३.१९ लक्ष मात्रचे खर्चास मा. तदर्थ समितीचे दि. ११/१२/२०२० रोजीचे सभेत निर्णय क्रं. ४९४ अन्वये मान्यता देणेत आली आहे.त्यानुसार विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला असून सध्या काम प्रगतीत आहे.

## ❖ संस्थानमार्फत अर्थ सहाय्य केलेले सार्वजनिक विकास प्रकल्प

**१. शिर्डी बसस्थानक व भक्तनिवास इमारतीस अग्नीशमन यंत्रणा बसविणे-**

साईभक्तांना निवारा, प्रसादभोजन या मूलभूत सोयी सुविधांबरोबरच इतर अनुषंगिक सेवा, संस्थान व्यवस्थापनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. मा. व्यवस्थापन समितीने विविध निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आर्थिक सहकार्यातून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे मालकीच्या जमिनीत शिर्डी येथील बसस्थानक तथा भक्तनिवास अद्यावत सोयींनी युक्त बसस्थानकाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदरहु इमारतीमध्ये अग्नीशमन यंत्रणेचा समावेश नसल्याने या ठिकाणी अग्नीशमन यंत्रणा बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. या कामासाठी रु.१०.६२ लक्ष मात्र इतका खर्च संस्थान निधीतून करणेत आलेला आहे.

## ❖ विश्वस्तव्यवस्थेचे नियोजीत विकास प्रकल्प

o

**१. नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे-**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे निर्णयानुसार वेअर हाऊस पध्दतीचे एकूण १८२१ चौ. मी. क्षेत्रफळ असलेले दोन मोठे गोडाऊन बांधकामासाठी प्लॅन व इस्टीमेट सादर करणेबाबत आर्किटेक्ट बिनेश सुकूमार कोची यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. याकामासाठी अंदाजे रु.३.०३ कोटी खर्च अपेक्षित आहे. याबाबत मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.३१/०७/२०२१ रोजीचे सभेतील निर्णयानुसार आर्किटेक्ट नेमणूकीबाबत नव्याने प्रस्ताव तयार करणेत येत आहे.

**२. नियोजित शैक्षणिक संकुल प्रकल्पातील इमारतींकरीता फर्निचर वर्क, ऑडीओटोरीयम करीता फर्निचर, ॲकॉस्टिक वर्क व एच.व्ही.ए.सी. यंत्रणा तसेच स्पोर्ट कॉम्पॅलेक्स करीता खेळाचे, व्यायामाचे साहित्य खरेदी करणे, खेळाचे मैदान विकसीत करणे व लॅन्ड स्केपिंग करणे-**

संस्थानचे निमगांव को-हाळे येथिल गट नं. १८३ मध्ये नियोजित शैक्षणिक संकुल प्रकल्पाचे बांधकाम करणेत येत आहे. यामध्ये सर्व शैक्षणिक संकुलातील इमारतींमध्ये फर्निचर वर्क, वर्गातील बेंच, प्रयोगशाळा, वाचनालय, शिक्षक कक्षातील टेबल खुर्ची, कार्यालयीन फर्निचर इ. बाबींचा समावेश आहे. ऑडीटोरिअम करीता फर्निचर ॲकॉस्टिक वर्क व H.V.A.C. वर्क तसेच स्पोर्टस् कॉम्प्लेक्स करीता खेळाचे, व्यायामाचे साहित्य खरेदी करणे, खेळाचे मैदाने विकसीत करणे. लॅण्डस्केपींग करणे तसेच सर्व क्लासरुम डिजीटल करणे. C.C.T.V. कॅमे-यांची व्यवस्था करणे इ. सुविधा करणेत येणार आहे. यासाठी आर्किटेक्ट यांचेमार्फत अंदाजपत्रक व नकाशे तयार करणेत आले आहेत.

**३. श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी आणि दिक्षितवाडा या पूरातन वास्तूंचे सुदृढीकरण करणे-**

श्री साईबाबा समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी व दिक्षीतवाडा या पुरातन वास्तु १०० वर्षापेक्षा आधिक जून्या असून त्या दिर्घ काळापर्यंत जतन होणेसाठी त्याचे सुदृढीकरण करणे आवश्यक आहे. याकामी सल्लागाराची नेमणूक करुन त्यांचेमार्फत सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे. सदरहू अंदाजपत्रकीय प्रस्तावाची श्री सब्यसाची मुखर्जी, महासंचालक, छत्रपती शिवाजी महाराज वस्तु संग्रहालय (S M V S, Mumbai) यांचे मार्फत तपासणी करणेत आली आहे. श्री मुखर्जी यांचे सुचनेप्रमाणे आवश्यक बदल करुन प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेत येणार आहे.

**४. मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दारांचे नावात बदल करुन पितळी अक्षारात नविन बोर्ड तयार करुन बसविणे-**

दि.१४/०१/२०२० रोजी झालेल्या मा.तदर्थ समितीचे बैठकीतील निर्णय क्र.०७ अन्वये मंदिर परिसराचे सर्व प्रवेशव्दारांचे नांवात बदल करणेस व पितळी अक्षरात नवीन बोर्ड तयार करुन बसविणेस तसेच याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु.४.७५ लक्ष मात्रच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. याकामी ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करणेत आली असून निम्नतम दराचे ठेकेदार यांचेशी चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेकामी मा.तदर्थ समितीचे सभेत प्रस्ताव सादर केला आहे.

**५. साई नॉलेज पार्क प्रकल्प उभारणे-**

श्री साईभक्तांचे मनोरंजनासाठी व त्यांना श्रींचे जीवनचरित्राविषयी माहिती उपलब्ध व्हावी यासाठी मौजे निमगांव को-हाळे येथिल गट नं.१९८, १९९, २०० व २०१ मधील संस्थानचे २० एकर जागेत साई नॉलेज प्रकल्प उभारणे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पात बाबांचे जीवन चरित्रावर आधारीत चलचित्राद्वारे व मुर्त्यांच्या आधारे देखावे उभारणे, प्लॅनेटोरीयम तसेच नामांकीत संतांचे व राष्ट्र पुरूषांचे वॅक्स म्युझियम इ. सुविधा निर्माण करणेत येणार आहे. सदर साई नॉलेज पार्क प्रकल्प उभारणेसाठी सल्लागार म्हणून श्री. संदिप शिक्रे ॲण्ड असो., मुंबई यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांचेमार्फत सदर प्रकल्पाचे अंदाजपत्रक व आराखडे बनविण्यात आले आहेत. सदर प्रकल्प संस्थानमार्फत उभारणेसाठी सल्लागार यांचेमार्फत सुधारीत प्रस्ताव तयार करणे प्रस्तावित आहे.

**६. लाडू व बुंदी प्रोसेसिंग युनिट-**

मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे गट नं. ८७/८८ मधील जागेत लाडू व बुंदी प्रोसेसिंग युनिट उभारणी करण्यात येणार असून त्यामध्ये बंदी व लाडू किचन, थर्मोफ्लयुडी हिटींग सिस्टीम, कोल्ड स्टोअरेज, सब स्टोअर, ऑनलाईन बेसन चक्की, बेसन मिक्सींग, लाडू सुकविणे व पॅकिंग इ. सुविधांचा त्यामध्ये समावेश करण्यात आला असून याकामी रक्कम रु.२९.७३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सदरहू प्रकल्पासाठी बांधकाम परवानगी प्राप्त करणेची कार्यवाही करणेत येत आहे.

**७. श्री साईनाथ रुग्णालयातील टॉयलेट बाथरुम नूतनीकरण करणे-**

श्री साईनाथ रुग्णालयातील टॉयलेट इमारतीमधील टॉयलेट बाथरुम हे सततचे वापराने खराब झालेले असल्याने टॉयलेट बाथरुमचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. सदरहू कामी आर्किटेक्ट यांनी नकाशे व अंदाजपत्रक अंतिम केले असून याकामी रक्कम रु.२.८९ कोटी मात्र खर्च अपेक्षीत आहे.

**८. संस्थानचे अग्निशमन वाहनांकरीता पत्राशेड उभारणी करणे-**

संस्थानचे मौजे निमगांव येथिल सर्व्हे नं. १४८ पै. मध्ये संस्थानचे फायर अॅण्ड सेफ्टी विभागाकडील वॉटर वाऊझर व फोम टेंडर करीता पार्किंग शेडचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. याकामी रक्कम रु.१३,८१,३३३/- मात्र अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित आहे. याकामी ई- निविदा मागविणेत आल्या असून निम्नतम दर देणारे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**९. मौजे निमगाव को-हाळे हद्दीतील चर रस्ता नगर मनमाड रोड ते गोदावरी उजवा तट कालवा संस्थानचे गट नं. २२१ व २४५ पर्यंतच्या रस्त्यांचे डांबरीकरण करणे-**

संस्थानचे गट नं. १७२ मधील साई धर्मशाळेकडे जाणेकरीता सदरचे चर रस्त्यापासून अंतर्गत रस्ता असल्याने साईधर्मशाळेकडे जाणेसाठी व मौजे निमगाव को-हाळे येथिल गट नं. २१८,२२१ व २४५ मधील संस्थान मालकीच्या जमिनी या रस्त्यालगत आहे. तसेच गट नं. १६९ मध्ये संस्थानची कर्मचारी निवासस्थाने असून या रस्त्याचा वापर संस्थानकरीता मोठया प्रमाणात होतो. सदर रस्त्याचे डांबरीकरण विहीत पध्दतीने ई निविदा मागवून संस्थानमार्फत करणेत यावे असे ठरले. तसेच याकामी शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस व येणा-या अंदाजे रक्कम रु.५७,०७,६६०/- मात्रचे खर्चास मान्यता दिली. याकामी सार्वजनिक बांधकाम विभाग संगमनेर यांचेकडे तांत्रिक मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

**१०.श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवास इमारतीकरीता वाढीव इलेक्ट्रीक लोडसाठी जनरेटर रुम बांधणे -**

श्री साईनाथ रुग्णालय व व्दारावती भक्तनिवास इमारतीकरीता वाढीव इलेक्ट्रीक लोडसाठी जनरेटर रुम बांधणीसाठी अंदाजे रक्कम रु.७१.१० लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित असून विद्युत विभागामार्फत मा. उच्च न्यायालयाचे मंजूरीबाबत कार्यवाही करणेत येत आहे.

**११.संस्थानचे सर्व्हे नं. १२४ पै. मधील संस्थानचे भांडार इमारतीचे पत्रे बदलणे रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामे करणे -**

संस्थानचे सर्व्हे नं. १२४ पै. मधील संस्थानचे भांडार इमारतीचे पत्रे बदलणे रंगकाम करणे व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी रक्कम रु.३०.४७ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**१२.श्री साईबाबा समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणे -**

श्री साईबाबा समाधी मंदिर शिर्डीचे सुरक्षा आढावा बैठकी दरम्यान आढळून आलेल्या त्रुटी व सुचनांची पुर्तता करणेसाठी समाधी मंदिर मुख्य मंदिरात दक्षिण बाजूकडील खिडक्यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने बुलेटप्रुफ काचा बसविणेबाबत निर्देश दिले. त्यानुसार याकामी समाधी मंदिर तळमजल्याच्या ०३ पहिल्या मजल्यावरील ०४ अशा एकूण ०७ खिडक्यांना बुलेटप्रुफ काचा बसविणेसाठी रक्कम रु.१९,३८,०००/- लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. याकामी येणारे खर्चास व सदर कामासाठी ई निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी सदरहु प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेत आला आहे.

**१३.श्री साईप्रसादालयातील अंतर्गत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे-**

श्री साईप्रसादालय परिसरातील मुख्य प्रवेशव्दार ते मेन्टेनन्स ब्लॉक या लांबीतील रस्त्याचे डांबरीकरण करणे व मेन्टेनन्स ब्लॉक ते एल.पी.जी गॅस प्लान्ट या लांबीतील रस्त्याचे खडीकरण करणे आवश्यक आहे. त्यासाठी ई-निविदा मागविणेत आल्या असून निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेस मान्यतेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत येत असून याकामी अंदाजे रक्कम रु.१९ लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे.

**१४.श्री साईबाबा हॉस्पिटल येथिल जनरल ओटी ०१ व ०२ चे फ्लोरींग बदलणे व इतर अनुषंगिक कामे करणेबाबत -**

श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जनरल ओ. टी. ०१ व ०२ मध्ये यापुर्वी रुग्णालयाकरीता इपॉक्सी कोटींग करण्यात आलेले होते. सदर इपॉक्सी कोटींग दर ०२ ते ०४ वर्षांनी खराब होते. आता सदर ओटींची परिस्थीती फार खराब झालेली आहे. वैद्यकिय संचालक यांचे मागणीप्रमाणे त्याठिकाणी ग्रेनाईट फ्लोरींग बसविणे. तसेच लस्टर पेंट, अॅल्युमिनिअम डोअर इ. कामे करणे प्रस्तावित आहे. याकामी रक्कम रु. ६,०५,७५०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.